ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १६ मार्च, १९५५ | अंक ११

## विविध माहिती

**जर्मनीचा शस्त्रास्त्रावर खर्च**—जर्मनीला पश्चिम युरोपच्या संरक्षक संघटनेंत भाग घेऊं देण्यासंबंधीचे तह अंमलांत आले तर पहिल्या तीन वर्षांत ३,००० कोटी मार्कस अथवा २५० कोटी पौंड शस्त्रास्त्रावर खर्च करावे लागतील, असा हिशेब प. जर्मनीचे अर्थमंत्री प्रो. लुडविग् एरहार्ड ह्यांनीं केला आहे.

**सीलोनमधील शंख-शिंपले**—बंगालची फाळणी झाल्यापासून प. बंगालमध्यें शंख-शिंपल्यांपासून बांगड्या तयार करण्याचा ग्रामोद्योग जोरानें फोफावला आहे. बांगड्या तयार करण्यासाठीं लागणारे शंख-शिंपले सीलोनमधून आयात करण्यावरील निर्बंध रद्द करण्याचें भारतीय सरकारनें नाकारलें आहे. आतां जरूर तें साहित्य मद्रासहून आणून कामगारांना वांटण्याची योजना आंखण्यांत आली आहे.

**क्रीडांगणें बांधण्याची योजना**—मध्य-प्रदेश सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत राज्यांतील सर्व महत्त्वाच्या शहरांतून आधुनिक पद्धतीचे स्टेडिअम्स बांधण्याचें ठरविलें आहे. जबलपूर येथें क्रीडांगणासाठीं ९९ एकर क्षेत्र असलेली एक जागा मुक्रर करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या क्रीडांगणासाठीं मध्यप्रदेश सरकार दरवर्षी २ लाख रुपये ह्याप्रमाणें १० वर्षे खर्च करणार आहे.

**सौराष्ट्रामधील हातमागाचा धंदा**—सौराष्ट्राच्या ग्रामोद्योग बोर्डानें छोट्या उद्योगधंद्यांना मदत म्हणून ४६,५०० रुपयांचीं कर्जें मंजूर केलीं आहेत. तेलावर जळणाऱ्या नवीन पद्धतीचा स्टोव्ह तयार करणाऱ्या एका अर्जदाराला ५०० रुपयांची मदतहि मंजूर करण्यांत आली. त्याचप्रमाणें, नवीन पद्धतीची कानस तयार करण्यासाठींहि ५०० रुपयांची मदत देण्यांत आली.

**पृथ्वीचा कृत्रिम उपग्रह**—विमानांच्या कारखान्यांतील एका ब्रिटिश तज्ज्ञानें असें जाहीर केलें आहे कीं, आणखी दहा वर्षांत पृथ्वीभोंवतीं फिरणारा कृत्रिम उपग्रह मनुष्याला निर्माण करतां येईल. हा उपग्रह १२ दिवस पृथ्वीभोंवतीं फिरेल व त्या कालांत २०० प्रदक्षिणा करून परत येईल. त्यानंतर असा एक कायमचा उपग्रह तयार करतां येणें शक्य होईल व चंद्रावरील स्वारीहि शक्य कोटींत येईल.

**हिंदी पुस्तकांना उत्तेजन**—येत्या बारा महिन्यांत सर्व विषयांवरील हिंदी पुस्तकांना उत्तेजन देण्यासाठीं उत्तर-प्रदेश सरकारनें १ लाख रुपयांची रकम बाजूला काढून ठेवली आहे. हिंदी वाङ्मयाचा विकास घडवून आणण्यासाठीं हा उपक्रम करण्यांत आला आहे. स्वतंत्र ग्रंथ अगर इतर भाषांतील प्रसिद्ध ग्रंथांचीं भाषांतरें ह्यांनाहि स्थान देण्यांत येणार आहे, असें समजतें.

**पाकिस्तानांतील नियंत्रणें**—पाकिस्तानमध्यें सध्यां कांहीं वस्तूंच्या किंमतींवर नियंत्रणें आहेत. पुढील महिन्यापासून तीं रद्द करण्यांत येणार असल्याचें समजतें. सध्यां टायर्स व ट्यूब्स, मुलांना लागणारे अन्नपदार्थ, कांहीं प्रकारचें आयात केलेलें कापड, इत्यादि वस्तूंच्या किंमतींवर नियंत्रणें आहेत. आयात करण्यांत येणाऱ्या वस्तूंचा सांठा वाढल्यामुळें हळुहळू विनियंत्रण करण्यांत येत आहे.

**जपानमधील ग्रामीण जीवनाचा अभ्यास**—जपानमधील शेतीचें तंत्र व ग्रामीण जीवनाची परिस्थिति ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं ३२ भारतीय विद्यार्थिनींची एक तुकडी त्या देशांत गेली आहे. जपानमध्यें तीन आठवडे हिंडून हा अभ्यास करण्यांत येणार आहे. विद्यार्थिनींचा खर्च भारतीय सरकार आणि अमेरिकेचे परदेशीय मदतखातें मिळून सोसणार आहेत.

**हिमाचल प्रदेशांत घड्याळांचा कारखाना**— घड्याळें तयार करणाऱ्या कामगारांना शिक्षण देऊन तज्ज्ञ करण्याचें एक केंद्र हिमाचल प्रदेशांत उघडण्यांत येणार आहे. हा उपक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग असून त्यासाठीं १ लाख रुपये खर्च येणार आहे. सुमारें तीन वर्षांनीं हिमाचल प्रदेशांत घड्याळें तयार होऊं लागतील.

**पाकिस्तानची तांदुळाची निर्यात**—पाकिस्ताननें सीलोनला तांदुळाचा पुरवठा करण्याचा करार केला आहे. १९५४-५५ च्या हंगामांतील पिकांपैकीं ४०,००० टन तांदूळ पुरविण्याचें पाकिस्ताननें कबूल केलें आहे. सीलोनशीं पाकिस्ताननें तांदुळासंबंधीं केलेला हा दुसरा व्यवहार आहे. ह्यापूर्वी पाकिस्ताननें ९,००० टन तांदूळ पुरविला आहे.

**बारडोली येथें साखरेचा कारखाना**—बारडोली येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याला प्रारंभीं ५० लाख रुपयांचें भांडवल लागेल. त्यापैकीं १५ लाखांचें भाग-भांडवल खपलें असून मुंबई सरकारनें १० लाख रुपयांचे भाग घेण्याचें मान्य केलें आहे. भारताच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडे ४० लाख रुपयांच्या कर्जाची मागणी करण्यांत आली आहे.

**अमेरिकेंतून येणारें तूप**—अमेरिकेंत सांठून राहिलेल्या लोण्याचें तूप बनवून तें भारतांत विक्रीला पाठविण्याचा अमेरिकन सरकारचा बेत आहे. ह्याबद्दल भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान सध्यां वाटाघाटी चालू आहेत. नमुना म्हणून अमेरिकेंतून प्रथम ५०० टन तूप आयात करण्यांत येणार आहे. हें तूप भारतांत बहुधा जुलै-ऑगस्टच्या सुमारास येईल.

## औद्योगिक व शेती-उत्पादनांत वाढ

### अर्थमंत्र्यांचें संसदेमधील भाषण

शेतकीच्या तसेंच, औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनांत वाढ दिसून आली. १९५३–५४ मध्यें अन्नधान्याचें ६·६ कोटी टन उत्पादन झालें. हा आंकडा पंचवार्षिक योजनेंत ठरविलेल्या लक्ष्याहून ४४ लक्ष टनांनीं अधिक आहे. गळित धान्यांचें उत्पादन ५६ लक्ष टन म्हणजे ठरविल्यापेक्षा १ लक्ष टनांनीं अधिक झालें. कापसाचें उत्पादन ३९ लक्ष गांसड्या झालें. हा आंकडा ठरविलेल्या लक्ष्याइतकाच जवळजवळ आहे. किंमतींतील बेसुमार चढउतारामुळेंच मुख्यत्वेंकरून तागाचें उत्पादन मात्र १९५०–५१ मधील उत्पादनांपेक्षा सुमारें ४·५ टक्क्यांनीं कमी होतें. उत्पादनांतील कांहींशी वाढ सतत दोन वर्षं असलेल्या हवामानविषयक अनुकूल परिस्थितीमुळें झाली आहे हें खरें असलें तरी, पाटबंऱ्यांच्या सोयींत केलेल्या वाढींमुळें, खतांच्या वाढत्या वापरामुळें, सुधारलेल्या बियाण्याच्या व तंत्रांच्या अवलंबामुळें व यासारख्या इतर अनेक उपायांमुळें आमच्या शेतकी उत्पादनांत त्यांपैकी बरीचशी कायम स्वरूपाची वाढ झाली आहे आणि वरील उपायांचा लाभ अधिकाधिक विभागांत होत आहे.

अन्नधान्यांच्या उत्पादनांत झालेल्या वाढींमुळें त्यांची ने-आण व वांटप यांवरील नियंत्रणें आणखी सैल करणें ही गोष्ट सरकारला शक्य झाली. वस्तुतः फक्त गव्हाच्या विभागांतील वाहतुकीवर असलेले कांहीं निर्बंध एवढींच काय तीं नियंत्रणें शिल्लक राहिलीं. हीं बंधनें देखील सरकारपाशीं असलेल्या गव्हाच्या सांठ्यांचा जास्तींत जास्त उपयोग होण्यासाठींच ठेवण्यांत आलीं.

मध्यवर्ती व राज्य सरकारांपाशीं सुमारें १५ लक्ष टन अन्नधान्यांचा पुरेसा सांठा झाला असून अन्नधान्यांची आयात बऱ्याच प्रमाणांत कमी झाली आहे. १९५४ मध्यें फक्त ८ लक्ष टन धान्य आयात झालें. १९५१ मधील आयातीचा हा आंकडा ४७ लक्ष टन होता, १९५२ मध्यें तो ३९ लक्ष टन व १९५३ मध्यें २० लक्ष टन होता. यापुढेंहि अन्नधान्यांची आयात फार मोठ्या प्रमाणावर होणार नाहीं; उलट, चांगल्या दर्जाच्या तांदुळाच्या आपल्या पूर्वपार चालत आलेल्या बाजारपेठांत पुनः स्थान मिळविण्यासाठीं कांहीं मर्यादित प्रमाणांत तांदूळ निर्यात करण्याजोगी आपली परिस्थिति आहे.

औद्योगिक उत्पादनांतहि बऱ्याच व्यापक क्षेत्रांत वाढ दिसून आली. ही वाढ, कापड, सूत, सिमेंट, ताग, तयार पोलाद व कोळसा या सर्व वस्तूंच्या बाबतींत झाली. घट दिसून आलेला एकच मोठा धंदा म्हणजे साखरेचा. हमावानविषयक प्रतिकूल परिस्थिति आणि इतर कांहीं खास कारणांमुळें हें घडलें. ही घट सुमारें २ लक्ष टनांची झाली.

### औद्योगिक विकास

औद्योगिक विकासाचा वेगहि उत्तेजनकारक होता. या वर्षांत अनेक नवे कारखाने सुरू झाले. तसेंच बऱ्याच नव्या क्षेत्रांत उत्पादनास प्रारंभ झाला. हीं नवीं क्षेत्रें म्हणजे ऑल गिअर हेड लेथ, मोटाराइज्ड बेंच ग्राइंडर, रोलर बेअरिंग, मोठे पंप, फ्यूएल इंजेक्शन इक्विपमेंट, स्टेपल फायबर, इ. होत. देशाचें झपाट्यानें औद्योगीकरण होण्यास साह्यभूत होण्याच्या दृष्टीनें दोन महत्त्वाचे उपाय योजण्यांत आले. सरकारी मालकीच्या नॅशनल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना हा पहिला, आणि इंडस्ट्रियल क्रेडिट ॲण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनची स्थापना हा दुसरा. हें दुसरें कॉर्पोरेशन इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट या संस्थेच्या प्रयत्नांमुळें आणि सरकारच्या सहकार्यानें व मदतीनें स्थापन केलेलें आहे. ती एक खासगी संस्था असून तिचें भरणा झालेलें भांडवल ५ कोटी रु. आहे. तें भारत, इंग्लंड व अमेरिका यांमधील पैसे गुंतविणाऱ्यांनीं भरणा केलेलें आहे.

छोट्या प्रमाणावरील धंद्यांच्या व घरगुती उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांतहि उत्पादन वाढावें म्हणून अनेक उपाय योजण्यांत आले. फोर्ड फाउंडेशननें पुरस्कार केलेल्या तज्ज्ञांच्या एका तुकडीनें त्यासंबंधीं कांहीं शिफारशी केल्या आहेत. त्या शिफारशींच्या आधारें छोट्या उद्योगधंद्यांसाठीं चार प्रादेशिक तंत्रविद्यात्मक संस्थांची, एका मार्केटिंग सर्व्हिस कॉर्पोरेशनची आणि एका स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे.

सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांपैकीं, हिंदुस्थान केबल फॅक्टरी आणि मशीन टूल फॅक्टरी या कारखान्यांत यंदा उत्पादनास प्रारंभ झाला. पेनिसिलीन व डी. डी. टी. कारखान्यांतून उत्पादनास लवकरच प्रारंभ होईल. ओरिसामध्यें रूरकेला येथें नव्या पोलाद-कारखान्याचें प्राथमिक कामदेखील प्रगतिपथावर आहे. नुकताच रशियाशीं एक करार करण्यांत आला असून, १० लक्ष टन तयार पोलाद निर्मिण्याची शक्ति असलेला एक आणखी पोलाद-कारखाना त्या करारानुसार स्थापन करण्यांत येणार आहे. सिंद्री खत कारखान्यानेंहि निर्धारित उत्पादनशक्ति जवळ जवळ गांठली असून, चित्तरंजन आणि इंडियन टेलिफोन यांसारख्या कारखान्यांतहि सुधारणा दिसून आली आहे.

---

### एक्सचेंज बँकेचा भारतांतील व्यवहार अनेक पटीनें वाढला !

“जगाच्या ह्या विभागांत दूरगामी राजकीय बदल घडून आले असले तरी आपल्या तेथील शाखांची प्रगति अखंड चालू आहे. सरकारी मुलकी व लष्करी ब्रिटिश नोकरांच्या खात्यांचें मोठें काम युद्धापूर्वी ह्या शाखांकडे असे. ह्या खात्यांपैकीं बहुतेक खातीं आतां बंद झालीं आहेत, पण त्या व्यवहाराची जागा घेणारा नवा व्यवहार उपलब्ध झाला आहे. १९३८ च्या मानानें तुलना केली, तर खात्यांची संख्या तिपटीनें वाढली आहे व ठेवींची रकम पाच पटींपेक्षा ज्यास्त झाली आहे. आपण मुख्यतः एक्सचेंज बँकिंगचा धंदा करतो व जागतिक बाजारपेठेंतील मालाच्या वहातुकीस पैसा पुरवितो. तथापि, भारत, पाकिस्तान व ब्रम्हा ह्या तीनहि देशांच्या औद्योगिक विकासासाठीं पैसा पुरविण्याचे कामांतील योग्य वाटा आपण उचलला आहे, खासगी उपक्रमांना आपण कर्जें दिलीं आहेत व सरकार-पुरस्कृत उपक्रमांतहि आपण भाग घेतला आहे.” लॉइड्स बँक लि. चे चेअरमन, सर ऑलिव्हर फ्रँक्स, ह्यांचें १९५४ मधील व्यवहाराबाबत निवेदन.

---

**शिक्षितांच्या बेकारीचें निवारण**— पंजाब सरकारनें राज्यांतील शिक्षितांची बेकारी दूर करण्यासाठीं ६० लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. पुढील आर्थिक वर्षांत राज्यांत एकाच शिक्षकानें चालविण्याच्या ९०० प्राथमिक शाळा उघडण्यांत येणार आहेत. शिवाय ३०० जादा शिक्षकांना सध्या चालू असलेल्या ३०० शाळांतून नोकऱ्या देण्यांत येणार आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. १६ मार्च, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## " शांतता हवी ? पैसे वांचवा व गुंतवा ! "

### श्री. बी. टी. ठाकूर ह्यांचें लंडनमधील भाषण

लंडन येथें ईस्ट इंडिया असोसिएशनच्या सभेंत दि. १ रोजीं प्रमुख हिंदी व इंग्रज व्यापारी व बँकर्स ह्यांच्यापुढें युनायटेड कमर्शिअल बँकेचे जनरल मॅनेजर, श्री. बी. टी. ठाकूर, ह्यांनीं भाषण करून हिंदी–ब्रिटिश संबंधावर आपले विचार व्यक्त केले. ग्रेट ब्रिटन व भारत ह्यांचे संबंध आज अत्यंत सलोख्याचे आहेत व हा सलोखा, शांतता आणि संस्कृति टिकविण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे, असें त्यांनीं सांगितलें. दोन्ही देशांतील विचारवंतांनीं ह्या सलोख्याच्या वाढीकडे लक्ष दिलें पाहिजे, असें त्यांनीं सुचविलें.

मानवी वितुष्टांचें खरें कारण बहुधा आर्थिक असतें; चालू परिस्थितिविषयीं समाजांतील गरीब लोकांचें किंवा गरीब देशांचें असमाधान एका बाजूनें वितुष्टास कारणीभूत होतें, तर दुसऱ्या बाजूनें चांगल्या रहाणीचा सराव असलेले लोक व देश आर्थिक दुरावस्थेमुळें आपली स्थिति खालावेल कीं काय, ह्या चिंतेंत असतात. वास्तविक, आतां शास्त्रीय व तांत्रिक प्रगति एवढी मोठी झालेली आहे, कीं, गरिबांचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठीं श्रीमंतांना खालीं ओढण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. आंतरराष्ट्रीय आर्थिक व औद्योगिक सहकार्याच्या द्वारां ही प्रगति घडवून आणली जात आहे, त्याचीं अमेरिकन मदतीचा कार्यक्रम व कोलंबो योजना हीं उदाहरणें आहेत. इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या स्थापनेंत हिंदी जनतेबरोबर ब्रिटिश व अमेरिकन पैसेवाल्यांनींहि सहकार्य केलेलें आहे व पहिल्या दर्जाचे ब्रिटिश बँकर, मि. पी. एस. बेल ह्यांचें नेतृत्व त्या संस्थेला लाभूं देण्यांत आलें आहे, हें वाढत्या आंतरराष्ट्रीय सहकार्याचेंच प्रतीक आहे. इंटर नॅशनल बँकेचें कार्य व १० कोटि डॉलर्सची इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापण्याचा तिचा निर्णय, हीच गोष्ट सिद्ध करीत आहेत. तथापि, सामान्य जनता, इतकेंच नव्हें तर कांहीं बँकर व उद्योगपती ह्यांना ह्या नवीन घटनेचें रहस्य पुरेसें उमगलेलें नाहीं व ते अद्याप खास सवलती व प्राधान्य ह्यांचीच भाषा बोलत आहेत. ही त्यांची वृत्ति बदलली पाहिजे, असें श्री. ठाकूर म्हणाले.

एकटें राजकीय स्वातंत्र्य आर्थिक प्रगति घडवून आणण्यास किंवा रहाणीचा दर्जा सुधारण्यास पुरेसें पडणार नाहीं; प्रगति एका रात्रींत घडून येऊं शकत नाहीं; त्यासाठीं स्वार्थत्याग, वेळ, योजना, ह्या सर्वांची आवश्यकता असते. त्याबरोबरच, श्रीमंत लोक व श्रीमंत देश ह्यांनीं भांडवल गुंतवून मदत करणें जरूरीचें असतें. पूर्वेकडील देशांना अशा प्रकारची मदत केली पाहिजे, ह्याची अधिकाधिक जाणीव जगांतील बँकर्सना होऊं लागलेली आहे. ह्या बँकर्सनीं लोकांना नवें ध्येयवाक्य सांगितलें पाहिजे : " शांतता हवी ! मग बचत करा व पैसे गुंतवा !" भारत हा स्वतंत्र, लोकसत्ताक देशांत सर्वांत मोठा देश आहे. त्याचें आर्थिक बळ सत्वर वाढविलें गेलें पाहिजे. ग्रेट ब्रिटनला ह्या बाबतींत बरीच मदत, अनुभव, तांत्रिक योजना व जरूर तर मध्यस्थ ह्या नात्यानें करतां येण्याजोगी आहे, असा श्री. ठाकूर ह्यांनीं समारोप केला.

---

### राजेरजवाड्यांच्या प्रासादांचा उपयोग

भारतामधील माजी संस्थानिकांच्या, अनेक ठिकाणीं प्रासादतुल्य इमारती आहेत. ह्या भव्य इमारतींसंबंधींचा प्रश्न लोकसभेंत उपस्थित करण्यांत आला असतां भारत सरकारचे मंत्रि सरदार स्वर्णसिंग म्हणाले, " भारतामधील संस्थानिकांच्या व जमिनदारांच्या मालकीच्या बऱ्याच इमारती आहेत. त्यांचा सध्यां कांहींच उपयोग करण्यांत येत नाहीं अगर फारच थोडा उपयोग करण्यांत येतो. कांहीं इमारतींची तर दुरुस्ती सुद्धां करण्यांत येत नाहीं. ह्या इमारतींच्या मालकांना योग्य त्या तऱ्हेनें आवाहन करण्यांत आल्यास त्यांच्यापैकीं बरेचसे मालक इमारतींची मालकी पूर्णपणें अगर कांहीं वर्षांपुरती सोडण्यास तयार होतील, असें ध्वनित करण्यांत आलें आहे. अशा प्रकारच्या किती इमारती प्रत्येक राज्यांत आहेत त्यासंबंधीं आणि त्यांचा काय उपयोग केला जातो त्यासंबंधीं माहिती गोळा करण्याविषयीं राज्य सरकारांना सुचविण्यांत आलें आहे " ह्या इमारतींचा उपयोग इस्पितळें, शाळा, सहकारी स्टोअर्स, ग्रामपंचायती, इत्यादींसाठीं करण्यांत येण्याचा संभव आहे. त्याशिवाय मनोरंजनाचे कार्यक्रम करण्याच्या जागा म्हणून, अगर ग्रामोद्योगांच्या मालाच्या शो-रूम्ससाठींहि त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे. निरनिराळ्या राज्यांतील वस्तुसंग्रहालयेंहि अशा इमारतींत ठेवतां येतील. तथापि, सर्व देशभर पसरलेल्या ह्या इमारतींची व्यवस्था कोणी व कशी ठेवावयाची असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. इमारतींची व्यवस्था व देखभाल जबाबदारीनें करण्यासाठीं एखादा राष्ट्रीय ट्रस्ट निर्माण करण्यांत यावा आणि त्याच्याकडे वरील काम सोंपविण्यांत यावें, अशी सूचनाहि करण्यांत आली आहे.

---

### अमेरिकन बँकांचें एकत्रीकरण

नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क व फर्स्ट नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क ह्यांचें एकत्रीकरण होणार आहे. नॅशनल सिटी बँक ही अमेरिकेंतील तिसऱ्या अनुक्रमाची मोठी बँक आहे.

चेस नॅशनल बँक व बँक ऑफ दि मॅनहॅटन कंपनी ह्यांचेंहि एकत्रीकरण होऊं घातलें आहे. त्यांच्या एकत्रीकरणांतून निर्माण होणारी संस्था अमेरिकन बँकांत दुसऱ्या अनुक्रमाची जागा पटकावील.

बँक ऑफ अमेरिका ही अमेरिकेंतील सर्वांत मोठी बँक आहे. तिची जिंदगी सुमारें ४५०० कोटी रुपये आहे.

## भारत सरकारच्या अंदाजपत्रकाचें स्वरूप

( भा. म. काळे )

भारत सरकारचें १९५५-५६ चें अंदाजपत्रक अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें ठरणार म्हणून त्याबद्दल कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित सामान्य जनता यांच्या ठिकाणीं उत्सुकता निर्माण झाली होती. एक तर डॉ. जॉन मथाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमिलेल्या करचौकशी कमिशनच्या शक्य तितक्या सूचनांचा नवीन कर बसवितांना विचार केला जाईल, असें अर्थमंत्र्यांनीं निश्चित शब्दांत सांगितलें होतें. दुसरी गोष्ट म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेचें हे शेवटचें वर्ष असल्यामुळें खर्चासाठीं फार मोठ्या रकमेची म्हणजे सुमारें ८०० कोटि रुपयांची तरतूद करावयाची असल्यामुळें पैसा कसा उभारला जातो याकडे साहजिकच लक्ष लागलें होतें. तिसरी गोष्ट म्हणजे समाजवादी आर्थिक धोरण लोकसभेनें व कॉंग्रेसनें नुकतेंच स्वीकारलें असल्यामुळें त्या दृष्टीनें अंदाजपत्रकांत कांहींतरी विशेष गोष्टी दिसतील अशी अनेकांची रास्त अपेक्षा होती. आणखी एक गोष्ट म्हणजे गेल्या वर्षी प्रथमच मोठ्या प्रमाणांत रु. २५० कोटि खर्च नोटा छापून करावयाचें ठरविलें होतें. या बाबतींत प्रत्यक्ष अनुभव काय आला व हा प्रयोग १९५५-५६ मध्यें किती प्रमाणांत चालू ठेविला जातो याबद्दलहि औत्सुक्य निर्माण झालें होतें. सारांश, पहिल्या पंचवार्षिक योजनेचें यश व पांचव्या वर्षांतील जबाबदारी, करचौकशी-कमिशनच्या शिफारशींची अंमलबजावणी व नोटा छापून खर्च भागविण्याच्या प्रयोगांतील अनुभव या तीन गोष्टींमुळें नवीन अंदाजपत्रकाबद्दल औत्सुक्य निर्माण झालें होतें.

याच्याच जोडीला १९५४-५५ मध्यें अन्नधान्याची परिस्थिति सुधारून नियंत्रणें व वांटपपद्धति रद्द करण्यांत आली, औद्योगिक उत्पादनहि बरेंच सुधारलेलें, मध्यमवर्गीयांसाठीं व सामान्य जनतेसाठीं १९५४ मध्यें उभारण्यांत आलेल्या कर्जाचें यश, परंतु याच घटनांबरोबर सुशिक्षितांतील वाढती बेकारी व १९५४ च्या शेवटच्या तिमाहींतील परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत, याहि गोष्टी आर्थिक परिस्थिति विचारांत घेतांना लक्षांत ठेवल्या पाहिजे.

१९५५-५६ च्या अंदाजपत्रकानें साधारणपणें कारखानदार व व्यापारी यांची निराशा झालेली नाहीं. अर्थात् सुपर टॅक्सच्या बाबतींत थोडी करवाढ झाली, परंतु घसाराफंडाच्या बाबतींत व नवीन स्थापन होणाऱ्या उद्योगधंद्यांच्या बाबतींत कांहीं सवलती देण्यांत आल्या आहेत. विजेचे पंखे, शिवणकामाचीं यंत्रें, इ. सोळा वस्तूंच्या उत्पादनावर जकात लादण्यांत आली आहे व त्याचबरोबर या वस्तूंच्या परदेशच्या आयातीवरील जकात तितक्याच प्रमाणांत किंवा मालाची किंमत स्वस्त होणार नाहीं इतकी वाढविली जाईल. यामुळें उत्पादनावरील जकाती किंवा आयात मालावरील वाढत्या जकाती शेवटीं सामान्यपणें गिऱ्हाइकांवरच पडत असल्यामुळें व्यापारी किंवा कारखानदार यांना तक्रार करावयास जागा नाहीं. कापड व साखर या गोष्टी सामान्य जनतेच्या दृष्टीनें उत्पादनावरील जकात वाढल्यामुळें महाग होतील. प्राप्तीकराचें वाढतें प्रमाणहि वरच्या श्रेणींतील मध्यमवर्गीयांना जाणवल्याशिवाय राहणार नाहीं.

१९५५-५६ चीं अंदाजी जमा रु. ४६८ कोटि ७६ लक्ष असून खर्चाचा अंदाज रु. ४९८ कोटि ९३ लक्ष आहे. वर उल्लेखिलेल्या करवाढीमुळें रु. २१ कोटि ७० लक्ष जास्त उत्पन्न येऊं शकेल. तरीहि रु. ८ कोटि ४७ लक्ष एवढी तूट राहील. लष्करी खर्चांत पुढील वर्षी वाढ होणार नाहीं व तो सुमारें रु. २०३ कोटि राहील ही अंदाजपत्रकांतील एक विशेष गोष्ट आहे. १९५४-५५ मध्यें ट्रेझरी बिलें काढून रु. २२० कोटि खर्च करण्यांत आला. १९५५-५६ मध्यें सर्व सरकारची संभाव्य जमा हिशेबांत घेऊनहि खर्चाच्या बाबतींत येणारी प्रचंड तूट भरून काढण्यासाठीं रु. ३४० कोटि खर्च ट्रेझरी बिलें काढून करावा लागणार आहे. याप्रकारचा खर्च सावधगिरीनें केला गेल्यामुळें चलनवाढीमुळें होणाऱ्या महागाईचा संभव नाहीं ही एक समाधानाची गोष्ट आहे.

नवीन अंदाजपत्रक समाजवादाकडे नेतें का ? याचें उत्तर देणें कठीण आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या वाढीवर भर असल्यामुळें कारखानदारवर्गाला थोड्याशा सवलती देण्यांत येऊन त्यांच्या सहकार्याची अपेक्षा केली आहे. फार तर सुपरटॅक्सबद्दल कारखानदारांना तक्रार करतां येईल. अप्रत्यक्ष करांची वाढ करून खालचा वर्ग व मध्यमवर्ग यांच्यावरील जबाबदारी वाढविण्यांत आली आहे. पुढील कांहीं वर्षांत वाढत्या उत्पादनाबरोबर सामान्य जनतेला अप्रत्यक्ष करांचें वाढतें दडपण सहन करावें लागणार, ही गोष्ट अंदाजपत्रकावरून स्पष्टपणें दिसतें.

---

### जरीच्या कामाची सहकारी गिरणी

सुरत येथें जरीची गिरणी सहकारी तत्त्वावर काढण्याची योजना तयार करण्यांत आली असून तिची चांगली प्रगति होत आहे. जरीच्या व्यवसायाला मदत करण्याच्या हेतूनें मुंबई सरकारहि ह्या बाबतींत लक्ष देत आहे. गिरणी उभारण्यासाठीं एकूण सुमारें ३,००,००० रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रकमेपैकी १,५०,००० रुपयांची रक्कम मुंबई सरकार कर्जाऊ देणार आहे. अशा प्रकारची गिरणी उभारण्याची कल्पना सुरत जरी-गुड्स प्रोड्यूसर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीतर्फे प्रथम पुढें मांडण्यांत आली. तांबें व पितळ यांच्या ठोकळ्यांपासून बारीक तार तयार करण्याची यंत्रसामुग्री गिरणींत बसविण्यांत येणार आहे. गिरणी चालविण्यासाठीं सोसायटीनें आपला कार्यक्रम तयार केला आहे. गिरणीची इमारत बांधण्यासाठीं ७५,००० रुपये भांडवली खर्च येईल. त्याशिवाय जरूर त्या यंत्रसामुग्रीसाठीं १,७५,००० रुपये गुंतवावे लागतील. गिरणीसाठी लागणारा कच्चा माल खरेदी करण्यासाठीं ५०,००० रुपये लागतील. सोसायटीनें मुंबई सरकारकडे आर्थिक मदत मागतांना असें आश्वासन दिलें आहे कीं, सरकारनें १,५०,००० रुपयांचें कर्ज दिल्यास उरलेली भांडवलाची रक्कम संस्था स्वतःच जमा करील. जरूर पडल्यास भाग-भांडवल विक्रीस काढण्याचीहि तयारी संस्थेनें दाखविली आहे. मुंबई-सरकारनें ही योजना मान्य केली आहे. अखिल भारतीय ग्रामोद्योग बोर्डाला भारतीय सरकारनें जी आर्थिक मदत केली आहे, त्या रकमेंतून १,५०,००० रुपये वरील सहकारी संस्थेला देण्यासाठीं मंजूर करण्यांत यावेत, अशी विनंति मुंबई सरकारनें भारतीय सरकारला केली आहे.

---

अणुशक्तीवर चालणारा रणगाडा—डेट्रॉइट येथील अमेरिकन सरकारच्या शस्त्रागारांत अणुशक्तीवर चालणारा रणगाडा तयार करण्यांत येत असल्याची माहिती मोटार-विषयक एंजिनिअर्सच्या संस्थेला सरकारतर्फे कळविण्यांत आली आहे.

**माकडांच्या निर्यातीवर निर्बंध**—आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय माकडांच्या निर्यातीस बंदी करणारा हुकूम भारतीय सरकारनें काढला आहे. माकडांना अमेरिकेंत पाठविण्यांत त्यांची फार आबाळ होते असें आढळून आलें आहे. माकडांची एक टोळी अमेरिकेच्या मार्गावर असतां लंडनमधील गुदामांत त्यांपैकीं २०० माकडें मेलेलीं आढळलीं.

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन

## जाहीर विनंती

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या सर्वसाधारण ( जनरल ) निवडणुकीसाठी मतदारांच्या याद्या तयार करण्याचे कामीं घरोघर हिंडून मतदार होण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तींची माहिती गोळा करण्यासाठी गणतीदार ( एन्युमरेटर्स ) नेमण्यांत आले आहेत. या कामाचा पसारा, व्याप्ति व महत्त्व लक्षांत घेऊन शहरवासियांनीं गणतीदारास सहकार्य व मदत देऊन मतदारांच्या याद्या निर्दोष करण्याचे कामीं हातभार लावावा अशी विनंती आहे.

नागरिकांनीं त्यांचे भागासाठी नेमलेला गणतीदार ज्यावेळीं त्यांचे घरीं येईल त्यावेळीं त्याचा जरूरीपेक्षा फार वेळ व घेतां आपल्या कुटुंबांतील मतदार होण्यास पात्र असणाऱ्या सर्व व्यक्तींचीं संपूर्ण नांवें व इतर माहिती द्यावी. घरोघर हिंडून गोळा करण्यांत येणारी माहिती ही मतदारांच्या यादीचा आधारभूत पाया असल्यामुळें ती संपूर्ण खरी, आणि कायद्याला व वस्तुस्थितीला धरून असावयास पाहिजे, आणि तशी ती असल्याबद्दल खात्री करून घ्यावी अशी सूचना सर्व गणतीदारांस दिली आहे.

कळावें, दिनांक ७ मार्च १९५५.

( सही ) एल. एम. नाडकर्णी,
म्युनिसिपल कमिशनर,
पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन.

## नोटीस

**दि बँक ऑफ कराड लिमिटेड, कराड.**

बँकेच्या भागीदारांची नववी साधारण सभा रविवार तारीख २७ मार्च १९५५ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत भरणार आहे. सदर वेळीं आपण अगत्य येणेंचें करावें अशी विनंति आहे.

सभेपुढील कामें

१. बँकेचा तारीख ३१–१२–१९५४ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद व नफातोटापत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट यांचा विचार करणें व मंजूर करणें;
२. डिव्हिडंड मंजूर करणें;
३. निवृत्त होणाऱ्या व फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या डायरेक्टरांचे जागीं चार डायरेक्टरांची निवडणूक करणें;
४. ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें;
५. अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं कामें.

बोर्ड ऑफ् डायरेक्टर्सचे हुकुमावरून,
कराड, म. वि. खंडकर,
ता. १३–२–१९५५ मॅनेजर.

**विशेष सूचना :**— बँकेचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें ता. २१ मार्च १९५५ ते २ एप्रिल १९५५ पावेतों ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंड्स् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी.,
( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. मा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक
मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | $4\frac{1}{2}$ लाख |
| रिझर्व व फंडस् | $5\frac{1}{4}$ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटि |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. $\frac{1}{2}$ |
| सेव्हिंग ... ... | रु. $1\frac{1}{2}$ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्षें मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## भा. वि. घारपुरे : व्यक्ति आणि कार्य

( लेखकः—पु. ग. काशीकर,
लॉर्ड रे महाराष्ट्र इं. म्युझियम, पुणें २. )

[ ३ ]

### नवीं, नवीं कामें

आहे तेवढ्यांत समाधान न मानतां नवीन नवीन काम निर्माण करून तें करीत राहणें हा त्यांचा स्वभावच बनला होता. अर्थातच नवीन काम निर्माण करण्यास कल्पकता लागतेच व काम निर्माण करून तें उत्तम प्रकारें चालविण्यास कर्तबगारीहि लागते व हे दोन्हीहि गुण त्यांचेजवळ होते. एक काम संपलें कीं, दुसऱ्या कामाची त्यांची योजना तयार असे व अशा तऱ्हेनें संग्रहालयाच्या कामांत ते जीवन व चैतन्य निर्माण करीत असत. नवीन गोष्टी शोधून जनतेपुढें व विशेषतः विद्यार्थ्यांचे पुढें मांडाव्या, त्यांनीं त्यांचा अभ्यास करावा, पुष्कळ वाचावें, पुष्कळ पाहावें व आपल्या ज्ञानांत भर घालावी ही त्यांची दृष्टि असे. आपल्या शोधक दृष्टीनें अशा कित्येक गोष्टी त्यांनीं उजेडांत आणल्या. श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांचा स्वतःचा तंतुवाद्यांचा चांगला संग्रह आहे हें लोकांना फारसें माहीत नाहीं, हें श्री. घारपुरे यांना समजल्यानंतर त्यांनीं श्री. आबासाहेबांना भेटून संग्रहालयांत त्यांच्या संग्रहांत असलेल्या तंतुवाद्यांचें एक दिवस प्रदर्शन भरविलें. त्यावेळीं श्रीमंत आबासाहेब यांनीं प्रत्येक तंतुवाद्याबद्दल माहिती सांगून प्रत्येक वाद्याचें वादनहि करून दाखविलें. नवीन होतकरू लहान कारखानदारास प्रारंभीं त्यांच्या मालास प्रसिद्धि हवी असते व लोकांपुढें आपला माल मांडावयास त्याला संधि पाहिजे असते. संग्रहालयानें कॉमनवेल्थ इमारतींत चालविलेल्या व्यापारसंवर्धन-गृहामार्फत ते अशा कारखानदारांना प्रसिद्धि मिळवून देत असत. कांहीं प्रसंगीं थोडा माल विकत घेऊन तो विक्रीस ठेवून त्यांस मदत करीत असत. कुरुंदवाडकडील श्री. पां. वि. जोशी या विद्यार्थ्यास त्यांनीं केलेल्या कार्डबोर्डच्या बारीकसारीक वस्तु विक्रीस ठेवून व इतर प्रकारें साहाय्य करून त्यांना आपला धंदा वाढविण्यास उत्तेजन दिलें. आज हाच विद्यार्थी मुंबईस उत्तम प्रतिकृति करणारा म्हणून प्रसिद्ध पावला आहे. श्री. जोशी यांनीं पुणें महानगरपालिकेसहि अशा प्रतिकृति तयार करून दिल्या आहेत. त्या संग्रहालयांत मांडून ठेविल्या आहेत.

### दीर्घोद्योग व टापटीप

ते अतिशय काम करीत व थकवा हा त्यांना ठाऊकच नव्हता. हा त्यांचा गुण प्रदर्शनांचे वेळीं जास्त प्रतीत होत असे. संग्रहालयामार्फत जीं मोठीं प्रदर्शनें भरत त्यावेळीं काम अतिशय असे. सर्व दिवसभर प्रदर्शनांत व कचेरींत काम असेच. याशिवाय पहांटे उठून पत्रव्यवहार पाहून पत्रोत्तराचा गठ्ठा सकाळीं ते शिपायाबरोबर कचेरींत पाठवीत असत. क्वचित् प्रसंगीं ते प्रदर्शनांतच जेवण करून तेथेंच झोपत असत. घरीं देखील जेवढें झोपतील तेवढीच विश्रांति. इतर वेळीं सारखा कांहींतरी उद्योग चालू असे. संग्रहालयाकडे येणारीं नियतकालिकें चाळून त्यांतील पत्ते काढून त्यांना पत्रें पाठवून संग्रहालयासाठीं वस्तू किंवा वाङ्मय मिळविण्याचें काम तर अव्याहत चालू असे. हें नसेल त्यावेळीं वाचन, नाहींतर बागेंत काम करणें, नाहींतर गुरांना चारा घालणें असे सारखे ते कांहींना कांहीं उद्योगांत गढलेले असत.

त्यांचें हस्ताक्षर फार सुंदर होतें. इंग्रजी, मोडी व बालबोध हीं त्यांचीं हस्ताक्षरें किरत्याइतकीं सुंदर असत. अलीकडे सुंदर हस्ताक्षर असणें हा गुण आहे, या गोष्टीचा लोप झाल्यासारखें झालें आहे. परंतु चांगलें हस्ताक्षर काढण्याबद्दल त्यांचा आग्रह असें. त्यांनीं लिहिलेले पत्राचे मसुदे सुंदर हस्ताक्षरांत लिहिलेले असत व हाताखालच्या लोकांनींहि चांगलें हस्ताक्षर काढावें असें त्यांचें सांगणें असें. रूरकी येथील नॅशनल एंपोरिअम या संस्थेनें ते करीत असलेल्या कंपास पेट्या संग्रहालयांत ठेविल्या होत्या. त्याबद्दल अभिप्राय लिहिण्याबद्दल चालकांनीं विनंति केल्यावरून त्यांनीं तो सुंदर मजकुरांत व सुंदर हस्ताक्षरांत लिहून त्यांचेकडे पाठविला. चालकांना तो इतका आवडला कीं त्यांनीं तो आपल्या कॅटलॉगवर प्रमुख ठिकाणीं त्यांच्या हस्ताक्षरांत मुद्दाम छापला होता.

### कर्तृत्वाचें आंकड्यांत वर्णन

आंकडेशास्त्रांत त्यांचें कर्तृत्व सांगावयाचें झाल्यास असें सांगतां येईल कीं, देणग्यांच्या व इतर रूपानें मिळालेला जेवढा पैसा आजपर्यंत संग्रहालयासाठीं खर्च करण्यांत आला तितक्या किंमतीची मालमत्ता आज संग्रहालयाजवळ आहे. १९४० सालापासून संग्रहालयास आजपर्यंत अंदाजें ४ लाख रुपये देणगीदाखल मिळाले, ( संग्रहालयाचा संसार देणग्यांवरच चालतो ) व साधारणतः इतक्या किंमतीची मालमत्ता आज संग्रहालयाच्या मालकीची आहे ही मालमत्ता फर्निचर, प्रदर्शनीय वस्तु, शिक्षणविषयक साहित्य, पुस्तकें, नियतकालिकें, जागा, या स्वरूपांत आहे. माझ्या पगारावर प्रतिवर्षीं खर्च होणारा पैसा मी संग्रहालयासाठीं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत मिळवून आणतो, असें ते अभिमानानें सांगत असत.

संग्रहालयाचें कार्य व त्याची भरभराट याच एका गोष्टीचा त्यांस रात्रंदिवस ध्यास असे; घरच्या संसाराकडे त्यांनीं फारसें लक्ष कधींच दिलें नाहीं. संस्थेचा संसार हाच आपला संसार त्यांनीं मानला व त्यासाठीच त्यांनीं आपलें शरीर आणि मन जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत झिजविलें. त्यांचें देहावसान दिनांक ६–१२–५४ सोमवारीं सकाळीं ६ वाजतां झालें. त्याच्या आदल्या दिवशीं रविवारीं प्रस्तुत लेखक रात्रीं ६ ते ८ दोन तास त्यांचेजवळ होता व संग्रहालयाच्या कामाबाबत बोलणें चाललें होतें. त्यावेळीं पुढील वर्षीं आपण हें करूं, तें करूं, अर्थसंकल्पांत याची तरतूद करावयास हवी, इत्यादि गोष्टी त्यांनीं सांगितल्या. डॉक्टरनीं विश्रांति घ्यावयास सांगितलें होतें तरी त्यांचें संग्रहालयीन कामाचें चिंतन रात्रंदिवस चालू असे. अजून पुष्कळ जगावयाचें आहे, पुष्कळ काम करावयाचें आहे, असा आशावाद ते प्रकट करीत असत. संग्रहालयाचें काम त्यांनीं १९३० ते १९५४ म्हणजे बरोबर दोन तपें केलें. तें करीत असतांना संग्रहालयाच्या विश्वस्तसमितीनें त्यांना त्यांच्या कार्यांत सर्वतोपरी साहाय्य केलें व त्यांच्या कामांत त्यांना हवा होता तेवढा भरपूर वाव दिला, ही गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे. स्वतःच्या संग्रहालयाचें त्यांनीं कार्य केलें एवढेंच नव्हे तर कोठेंहि संग्रहालयविषयक कार्य असल्यास त्यास तें मनोभावें व जास्तींत जास्त मदत करीत असत.

श्री. घारपुरे यांनीं महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत केलेलें कार्य इतकें थोर आहे कीं, ज्यावेळीं भारतांतील संग्रहालय चळवळीचा व संग्रहालयांचा इतिहास लिहिला जाईल व त्यांच्या कार्याचें मूल्यमापन केलें जाईल, त्यावेळीं श्री. घारपुरे यांच्या कार्याचा सुवर्णाक्षरांनीं उल्लेख करावा लागेल.

### विश्वस्तांनीं केलेला गौरव

संग्रहालयाच्या विश्वस्तसमितीच्या दिनांक १७ डिसेंबर १९५४ रोजीं भरलेल्या सभेंत विश्वस्तसमितीनें खालील दुखवट्याचा ठराव संमत केला आहे. त्यावरून श्री. धारपुरे ह्यांच्या कार्याबद्दल विश्वस्तसमितीला वाटणारा आदर उत्कृष्टपणें व्यक्त होत आहे:—

" संग्रहालयाचे क्युरेटर श्री. भा. वि. धारपुरे, यांना दिनांक ६-१२-१९५४ रोजीं सकाळीं ६ वाजतां पुणें येथें देवाज्ञा झाली हें नमूद करण्यास विश्वस्तसमितीस परमावधीचें दुःख होत आहे. सन १९३०पासून संग्रहालय पुनरुज्जीवित केल्यापासून त्यांनीं संग्रहालयासाठीं अविश्रांत परिश्रम केले. जवळ जवळ शून्य स्थितींत असलेल्या संग्रहालयास आज जी उन्नत स्थिति प्राप्त झाली आहे त्या सुयशास मुख्यत्वेंकरून श्री. धारपुरे यांचे निरलस कष्ट कारणीभूत झाले आहेत. संग्रहालयाचा नांवलौकिक महाराष्ट्रांत व भारतांत त्यांनीं वाढविला एवढेंच नव्हें तर परदेशांतहि संग्रहालयाचें नांव पुष्कळांच्या परिचयाचें झालें आहे. त्यांची कर्तबगारी, दीर्घोद्योग, चिकाटी, दूरदृष्टि, जीवित कार्याविषयीं आत्यंतिक निष्ठा, हे गुण संग्रहालयाच्या भरभराटीस कारणीभूत झाले. असे सद्गुणी व कर्तबगार क्युरेटर निधन पावल्यामुळें संग्रहालयाचें अपरिमित नुकसान झालें आहे."

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १

### १५ व्या शिक्षणवर्गाचा निकाल

१५ व्या शिक्षणवर्गाची को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा जानेवारी १९५५ मध्यें घेण्यांत आली होती. सदर परीक्षेचा निर्णय नुकताच जाहीर झाला आहे. सदरील परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत.

**दुसरा वर्ग:—**बापट एम. बी., भोंगळे वाय. एस., बोंद्राळे एम. एम., चव्हाण ए. एच., दामले व्ही. टी., देशमुख एच. आर., देवरे जी. एस., धुमाळ बी. बी., घाणेकर आर. व्ही., जोशी ए. एस., जोशी आर. आर., कदम पी. आर., कदम एस. बी., काजळे व्ही. एन., कलोल पी. पी., कांबळे डी. एम., करमरकर व्ही. जी., खानगांवकर एन. के., कुलकर्णी आर. व्ही., महाबळ जी. बी., मराठे एस. एस., पाटील बी. बी., पाटील डी. टी., पाटील एस. एस., पवार के. एस., फडणीस आर. पी., शालीग्राम जी. वाय., तावरे बी. जी., थावरे ई. के., वालावलकर आर. व्ही., वरेकर एम. के., वाणी ई. एन., वाणी एस. टी.,

**तिसरा (पास) वर्ग :—** बाबर डी. जी., भद्रगले आर. जी., भावे एस. जी., देशमुख जी. आर., कुलकर्णी जी. टी., महाले ए. ए., महाले ए. यु., नरोडे एम. डी., नायकवाडी एम. के., नेर्लेकर व्ही. एम., पारखी एस. के., पाटील एच. टी., रानडे व्ही. वाय., शेन्ड्ये एस. जी., सोमण एन. आर., स्वामी बी. आर., टाकळकर ए. ए., वाळुंज बी. आर., वांबूरकर एस. एन., वाणी बी. व्ही., कुद्रळे जे. बी., महाले एल. एल., पुरंदरे ए. पी., देशपांडे डी. आर., सावंत बी. ए.

### अमेरिकन वुइमेन्स क्लब बॉल

मुंबईचा अमेरिकन वुइमेन्स क्लब १९ मार्च रोजीं वल्लभभाई पटेल स्टेडियमवर एक करमणुकीचा कार्यक्रम करणार आहे. ह्या कार्यक्रमाच्या पुस्तिकेंतील 'जाहिरातींची जागा विकून क्लबानें ७४,००० रुपये मिळविले आहेत. क्लबाच्या ह्या वार्षिक कार्यक्रमाच्या पुस्तिकेंतील जाहिरातींस ह्यापूर्वी इतकी रक्कम कधींच मिळाली नव्हती. वाटण्यासाठीं ९,००० रुपयांचीं १३,००० बक्षिसें फुकट मिळविण्यांत आलीं आहेत.

### कॉसमॉस बँकेचा सुवर्ण-महोत्सव ग्रंथ

कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें या बँकेस ५० वर्षें पुरीं होऊन दि. १८ जानेवारीला ५१ वें वर्ष लागलें आहे. त्या निमित्त बँकेनें एक सुवर्ण-महोत्सव ग्रंथ छापावयाचें ठरविलें आहे. तरी बँकेचे आजी व माजी सभासद्, हितचिंतक, इत्यादींनीं, या ग्रंथाच्या स्वरूपाविषयीं कांहीं सूचना करावयाच्या असतील तर त्या व त्यांत समाविष्ट करण्याकरतां माहीत असलेल्या कांहीं आठवणी किंवा बँकेच्या कामकाजावाबतची जुनी माहिती बँकेकडे दि. १५-४-१९५५ पर्यंत पाठविण्याची कृपा करावी.

### अमेरिकन तुपाची पाकिस्तानांत विक्री

अमेरिकन सरकारनें पाकिस्तानला २० लक्ष डॉलर्सला २० लक्ष शेर तूप विकलें आहे. म्हणजे, शेराला ४ रु. १३ आणे असा भाव पडला.


# NOTICE

**THE BELGAUM BANK LIMITED, BELGAUM.**

Notice is hereby given that the Annual General Meeting of the Share Holders of the Bank will be held on Tuesday 29th March 1955 at the Bank's own Building at Raviwar Peth, Belgaum at 1 p. m. to transact the following business :

(1) To receive and adopt the report of the Directors and the audited Statement of accounts for the year ended 31st December 1954.

(2) Declare a Dividend.

(3) To fill up the vacancies caused by the retirement of your Directors mentioned below

1. Shri. G. V. Saraf
2. Shri. S. M. Muttur &
3. Shri. N. S. Shirali

The retiring Directors are eligible for re-election and they offer themselves for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

By Order of the Board.

BELGAUM, 20-2-1955. } **G. L. Gajendragadkar,** *Chairman.*

Share holders desiring to ask any questions at the General Meeting are requested to send them to the Chairman before the 22nd March 1955 for convenience.

The transfer Books of the Company will be closed from 10th March 1955 to 29th March 1955 both days inclusive.

The Dividend when sanctioned will be paid on or after 31st March 1955. The Share holders are requested to communicate their change of address if any.

### पाकिस्तानी बजेट सादर कोणाला करावयाचें ?

पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारचें १९५५–५६ चें अंदाजपत्रक जाहीर कसें करावयाचें, हा प्रश्न पाकिस्तानांत निर्माण झाला आहे. पाकिस्तानची घटनासमिति ही मध्यवर्ती पार्लमेंट म्हणूनहि काम करीत होती. २४ ऑक्टोबर, १९५४ रोजीं गव्हर्नर जनरलनें घटनासमितीचें विसर्जन जाहीर केलें. हें विसर्जन कायदेशीर का बेकायदेशीर, ह्याची शहानिशा लाहोर येथील सर्वोच्च न्यायालय सध्यां करीत आहे. त्यासंबंधांत तडजोडीच्या वाटाघाटी चालू आहेत, त्या यशस्वी झाल्या व ३१ मार्च पूर्वी पार्लमेंटचा पुनर्जन्म झाला, तर नेहमींप्रमाणें त्याचेपुढें अंदाजपत्रक मांडतां येईल. पण वाटाघाटी बारगळल्या, तर गव्हर्नर जनरलला गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ (पाकिस्तानला लागू केलेला) च्या ४२ व्या कलमाच्या २ र्‍या उपकलमाप्रमाणें, अंदाजपत्रकांतील मागण्यांस कायदेशीरपणा प्राप्त करून द्यावा लागेल व त्यासाठीं ऑर्डिनन्स काढावा लागेल.

---

### सीलोनमध्यें जपानी उद्योगपती

सीलोनच्या पंतप्रधानांचें आमंत्रण स्वीकारून जपानमधील १२ व्यावसायिकांचें एक मंडळ सीलोनला आलें आहे. मंडळाचे नेते जपान चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष आहेत. सीलोनमधील उद्योगधंद्यांचा नियोजनपूर्वक विकास करण्याच्या कामांत हें मंडळ मदत देईल.

### ग्रेट ब्रिटनमधील बँकरेटमध्यें बदल

| | |
|---|---|
| २% | २६ ऑक्टोबर, १९३९ |
| २½% | ८ नोव्हेंबर, १९५१ |
| ४% | ११ मार्च, १९५२ |
| ३½% | १७ सप्टेंबर, १९५३ |
| ३% | १३ मे, १९५४ |
| ३½% | २७ जानेवारी, १९५५ |
| ४½% | २४ फेब्रुवारी, १९५५ |

### भारतामधील बँकरेटमध्यें बदल


| | |
|---|---|
| १९३८–३९ | ३% |
| १५ नोव्हेंबर १९५१ | ३½% |

---

### सिगारेटच्या खपाचें प्रमाण घटलें

धूम्रपान व कॅन्सर ह्यांच्यांतील संबंधाला प्रसिद्धि देण्यांत आल्यापासून अमेरिकेंत धूम्रपान करणार्‍यांची संख्या कमी होऊं लागली आहे. गेल्या वर्षी सिगारेटसच्या खपांत ५ टक्के घट झाल्याचें दिसून आलें आहे. सिगारेटचा धूर बाधूं नये म्हणून एक टोक विशिष्ट तर्‍हेनें बनविण्यांत आलेल्या सिगारेटसचें उत्पादन १९५२ च्या मानानें सातपट वाढल्याचें आढळतें.


किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक



हा चरक चालविण्यास ८।१० हॉ. पॉ. एंजिन लागते. दरएक तासास १२०० ते १५०० पौंड ऊंस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.

—सविस्तर माहितीसाठीं लिहा.—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.



कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १३८ ★ किंमत ३॥ रु.

" आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. "

ग. वा. मावळंकर

लोकसभेचे अध्यक्ष

( " कण आणि क्षण " च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा. )



पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.